# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 23/06/2020 (मंगळवार)
(सायंकाळ)

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक 23/06/2020 रोजी पो.स्टे. केळवदचा स्टाफ नाईट पेट्रालिंग करीत असतांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, सावळी गावाकडून पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे रोडनी एमपी–36/एए–2041 क्रमांकाचा गाडी मध्ये अवैध्यरीत्या कतलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा खबरे वरुन पो.स्टे. केळवद स्टाफ पांढुर्णा रोड हायवे क्र. 47 वरील सावळी फाट्यावर नाकाबंदी लावून वाहन तपासात असतांना दिनांक 23/06/2020 चे पहाटे 04:00 वा. दरम्यान एक एमएच– 36/एए–2041 क्रमांकाची बोलेरो पीकअप गाडी भरधाव वेगाने येतांना दिसले. चालकाला थांबविण्याचा ईशारा दिला असता त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन नागपूरच्या दिशेने पळवुन नेले. पोलिसांना त्या वाहनाबाबत संशय आल्याने वाहनाचा पाठलाग करीत असतांना चालकाने त्याच्या ताब्यातील बोलेरो गाडी उमरी, तसेच बिहाडा फाटयावरून तेलंगखेडी रोडने गाडीवळवुन तेलंगखेडी गावाच्या दिशेने पळवु लागला. तेलंगखेडी गाव ओलांडून प्रेम सावजी यांचे पोल्ट्री फॉर्म जवळ समोरून वाहन आल्याने सदर वाहन चालकानक त्या ठिकाणी वाहन थांबवुन वाहन सोडुन अंधाराचा फायदा घेत वाहन चालक व त्याचा सोबती पळुन गेले. पोलिस स्टाफच्या मदतीने पाहणी केली असता सदर वाहनात 10 गाई गौवंश जनावरे अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले. सदरचे जनावरे ही कत्तलीसाठी वाहनात भरुन घेवुन जात होते. एकुण 10 नग गाई गौवंश किमती 1,00,000/– रु., एक एमएच– 36/एए–2041 क्रमांकाची बोलेरो पीकअप गाडी किमती 8,00,000/–रुपये असा एकुण कि. 9,00,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 153/2020 कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. 1960 सह कलम 5 (अ), 9 महा. सरंक्षण अधिनीयम 1965 सहकलम 179, 184, 134/177 मो वा का 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास पोउपनि श्री अर्जुन राठोड हे करीत अहेत.

सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, पोशि सचिन येडकर, चानापोशि गुणेश्वर डाखोळे, होमगार्ड सैनीक विजय वडकी, नानुसाव राऊत यांनी केली आहे.







पोलीस माहिती कक्ष

<u>नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर</u>